| Publication/ Portal: **Saamna** |
|---|
| Date: February 26, 2018 |

# नॅनो सौरउर्जा हीटरबाबतचे संशोधन महत्वाच्या टप्प्यात

February 26, 2018

Facebook Twitter G+



सौर उर्जा क्षेत्रातील नगण्य संशोधन होत असताना खाजगी कंपन्यांनी सौर उर्जेवर चालणाऱ्या हीटरबाबत संशोधनाचा एक महत्वाचा टप्पा गाठण्याची तयारी सुरु केली आहे. या हीटरसाठी घराच्या किंवा इमारतीच्या गच्चीवर सोलार पॅनेल लावावे लागतात, तसेच पाण्याची एक टाकीही बसवायला लागते. जागा व्यापणाऱ्या पॅनेल आणि टाकीच्या पसाऱ्यामुळे अनेकांनी या सगळ्याचा आकार कमी होईल का अशी विचारणा करायला सुरुवात केली होती. यावर हीटर कंपन्यांनी लहान आकाराचे पॅनेल आणि इतर सामुग्री तयार करता येऊ शकते याबाबत संशोधन करायला सुरुवात केली आहे.

ॲरिस्टन थर्मो समूहाचे महाव्यवस्थापक अनिल भामरे यांनी सोलर हीटर आणि त्यात होत असलेल्या संशोधनाबद्दल विस्ताराने माहिती देताना सांगितलं की "या यंत्रणेचा आकार कमी करणं हे हिंदुस्थानमधल्या सगळ्याचं कंपन्यांसाठी एक मोठं आव्हान आहे". सुर्यप्रकाश पुरेशा प्रमाणात सौर पॅनेलवर पडणं ही महत्वाची बाब आहे, तसं झालं तरच सौरउर्जा व्यवस्थित मिळू शकते.आपल्या देशाची एकूण भौगोलिक परिस्थिती बघता एखाद्या घरापुरता किंवा फ्लॅटपुरता ही यंत्रणा लावायची असल्यास सौरप्रकाश या पॅनेलवर पडणं मुश्कील बनतं. कारण एखाद्या घरासाठी लावण्यात आलेले सोलार पॅनेल हे गच्चीवर न लावता ते त्या विशिष्ट घराबाहेर लावलं जातं. भामरे म्हणाले की "चीनमध्ये हा प्रयोग यशस्वी होतोय कारण तिथे सुर्याची किरणं घरापुरता लावलेल्या पॅनेलवर व्यवस्थितरित्या पडत असतात. टक्केवारीत सांगायचं झालं तर चीनमध्ये ७० टक्के सुर्यप्रकाश हा या पॅनेलवर पडतो. हिंदुस्थानात हेच प्रमाण २० टक्के आहे, त्यामुळे एका घरापुरता सोलर हीटर तयार करणं हे मुश्कील काम आहे." या परिस्थितीवर मात करण्याचे प्रयत्न गेल्या काही वर्षांपासून सुरू आहेत. येत्या ६-७ महिन्यात याबाबत महत्वाची प्रगती झालेली बघायला मिळेल असं भामरे म्हणाले.